# १
# मराठी छंद

१. अभंग, दिंडी, साकी, घनाक्षरी, सवाई, छप्पा, ओवी, कटिबंध, चूर्णिका, यांना केवळ मराठी छंद म्हणतात. (गोडबोले, वृत्तदर्पण). केवळ मराठी छंद म्हणजे संस्कृत, महाराष्ट्री, हिंदी, व्रज, अपभ्रंश, फारशी वगैरे भाषांतून जे छंद घेतलेले नाहीत ते. उपर्युक्त आठ छंदांतून केवळ मराठी छंद किती आहेत हे येथे पहावयाचे आहे.

२. उपर्युक्त आठांपैकी, चूर्णिका गद्यकाव्यांत मोडते. तिचे लक्षण प्राकृत पिंगलांत असे दिले आहे :-

अकठोराक्षरं स्वल्पसमासं चूर्णकं विदुः ।
तद्धि वैदर्भरीतिस्थं गद्यं हृद्यंतरं भत्रैत् ।।३४१।।

नांवावरून व रीतीवरून चूर्णिका संस्कृतातून घेतली आहे हे स्पष्ट आहे. चूर्णिका, उत्कलिका वृत्तगंधि, या तिन्हींना मराठीत चूर्णिकाच म्हणतात. कडाका ही एक प्रकारची चूर्णिकाच आहे.

३. मराठीत सवाई अशी संज्ञा ज्या पद्यांना देतात, त्यांपैकी बहुतेक सर्व बावीसपासून चोवीस अक्षरे ज्या वृत्तांत येतात त्यांपैकी आहेत. येवढेच की, दर पादांत एकाच गणाचे सातत्य-निदान बाहुल्य असावे. अमृतध्वनी (२२ अक्षरे), अश्वघाटी (७ तगण+ग), उमा (७भगण +ग), मदिरा (७भगण+२गण, २३ अक्षरे), दुसरी मदिरा (५ भगण+ रगण+ नगण+ २ग), तिसरी मदिरा (नगण+६जगण+लग), सुंदरी (२३ अक्षरे), या सर्वांना मराठीत सवाईच म्हणतात. मोरोपंताचे सवाई रामायण मदिरा छंदांत आहे. उद्धवचिद्धनाची सवाईगीता बावीससाक्षरी व तेवीसाक्षरी वृत्तांत आहे. गण हे काही एका मर्यादेत वाटेल तसे बदलतात. दोन तीन अक्षरे टाकून दीर्घ मात्र पाच सात वेळा सातत्याने आली पाहिजे व अक्षरे बावीस किंवा तेवीस पाहिजेत हे बीज.

रामासी अनुकूल असतील त्यांचे पाडीन दात तरीच खरी मी (२४)

अथवा

रामासी अनुकूल असतील त्यांचे पाडीन दात तरीच खरी (२३)

अथवा

रामासी अनुकूल असतिल त्यांचे पाडिन दात तरिच खरी (२३)

अथवा

रामासी अनुकूल असतिल त्यांचे पाडिन दात तरिच खरी (२३)

या तेवीसाक्षरी व चोवीसाक्षरी वृत्तांना मराठीत सवाईच म्हणतात. सवाई हा शब्द फारशी असून त्याचा अर्थ 'सारखा' असा आहे. ज्या वृत्तांत एकच गण एकसारखा अथवा बाहुल्याने येतो ते सवाईवृत्त समजावे. परंतु प्राकृतपिंगल या वृत्तांना सवाई हे नाव देत नाही. प्राकृतपिंगल द्वाविंशत्यक्षरात्मकवृत्ताचे प्रस्तारगत्या ४१९४३०४ भेद, त्रयोविंशत्यक्षरात्मक वृत्ताचे ८३८८६०८ भेद व चतुर्विंशत्यक्षरात्मक वृत्ताचे १६७७७२१६ भेद करतो व सांगतो, की 'दिङ्मात्रमुदाहृतम् शेषभेदाः सुधीभिः प्रस्तार्योदाहइर्तव्याः' या बावीसाक्षरी, तेवीसाक्षरी व चोवीसाक्षरी कोट्यवधी प्रकारांतून ज्यात दीर्घ मात्र पाच सात वेळा योग्य स्थळी येईल त्या वृत्तांना मराठीत सवाई म्हणण्याची चाल पडली आहे. वस्तुतः या सर्व सवाया भिन्न भिन्न वृत्ते आहेत. प्राकृतपिंगल या वृत्ताहून निराळ्याच एका मात्राच्छंदाला सवाई म्हणतो. प्रत्येक पादांत एकतीस मात्रा व सोळाव्या मात्रेवर यति, अशी जी छंदोरचना तीस पिंगल सवाई म्हणतो. मग प्रत्येक पादांत किती अक्षरे येवोत. प्राकृतपिंगलाची सवाई अशी :

(२३) छदह मत्तह पढमहि दिज्जह मत्त ऍअत्तिस पाए पाअ

(२३) सोलहपंचदहहि जइ किज्जह अंतर अंतर ठाए ठाअ ।

(२१) चोवीसा स त्त भणिज्जइ पिंगल जंपइ छंदसु सार ।

(२१) अंत अ लहूअ लहूअ दिज्जहु णाम सवैआ छंद अपार २९१

असली मात्रासवाई मराठीत आढळत नाही. मराठीत सवाईच्या नावाखाली मोडणारी सर्व पद्ये गणवृत्तात्मक आहे. हा प्रकार निरंजन माधवाने आपल्या सद्वृत्तमुक्तावलीत दिला आहे. (महाराष्ट्रकवि, अंक ३७). तो म्हणतो :

प्राकृत लोक न जाणति मूळ, उगेंच उला कथिताती सवाई ।।

म्हणजे मराठीतील सवाई संस्कृतातून घेतली आहे व सवाई हे नाव हिंदीच्या द्वारा फारशीतून घेतले आहे. 'सवाई' हा फारशी शब्द प्राकृतपिंगलांत आल्यामुळे, त्या ग्रंथाचे कर्तृत्व मुसुलमानी अमलात पडते, हे उघड आहे.

४. छप्याला प्राकृतपिंगल छप्पअ म्हणतो. छप्पअ शब्द षट्पद शब्दाचे प्राकृत रूप आहे. मराठी छप्पा प्राकृत 'छप्पअ' आहे.

५. साकी हा शब्द वैदिक शक्करी या शब्दापासून निघाला आहे. शक्करी = सक्कई = साकी. पिंगलाचार्यविरचित छंदशास्त्राच्या चवथ्या अध्यायाच्या सातव्या सूत्रावरच्या वृत्तीत भट्ट हलायुध शक्करीचे वर्णन करताना लिहितो :-

षट्पंचदशाक्षरा शक्करी ।

म्हणजे वैदिक शक्करी छंदांत एकंदर अक्षरे ५६ असतात; तोच प्रकार मराठी साकींत मात्रासंबंधाने आहे. सबंध साकीत ५६ मात्रा असतात व तिच्या प्रत्येक अर्धांत २८ मात्रा असतात. वस्तुतः पाहता गकारद्वययुक्त लघु अक्षरांनी जर सबंध साकी रचली तर मात्रा आणि अक्षरे यांची संख्या बहुतेक सारखी म्हणजे ५६ व ५४ असेल. उदाहरणार्थ :-

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| म | द | क | ल | ख | ग | कु | ल | क | ल | र | व | मु | ख | रि | णि |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७/२८ |
| विं | क | सि | त | स | रं | सि | ज | सु | व | ने |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| गि | रि | व | र | प | रि | स | र | स | र | सि | म | ह | ति | ख | लु |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ २८ |
| र | ति | र | ति | श | य | मि | ह | भ | व | ताम् ।। |

या साकींत दोनच अक्षरे काय ती दीर्घ आहेत; कारण, साकी छंदाला दर अर्धाला अंती गुरू लागतो. सर्व अक्षरे जीत गुरु आहेत, अशी साकी येणेप्रमाणे :

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४ | ६ | ८ | १० | १२ | १४ | १६ |
| सौ | म्या | दृ | ष्टिं | दे | हि | स्ने | हात् |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | २० | २२ | २४ | २६ | २८ |
| दे | हे | मु | क्त्वा | मा | नम् |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४ | ६ | ८ | १० | १२ | १४ | १६ |
| आ | त्म | ज्यो | ति | र्यो | गा | भ्या | सात् |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | २० | २२ | २४ | २६ | २८ | |
| दृ | ष्ट्वा | दुः | ख | च्छे | दः | ।।२।। |

या गुर्वक्षर साकींत २८ अक्षरे व ५६ मात्रा आहेत. गुरुलघु अक्षरांच्या न्यूनाधिक्याने साकीचे एकंदर भेद ५६८ होतात. हा छंद संस्कृतात किंवा प्राकृतात फारसा योजलेला आढळत

नाही. आर्या, गीति, उपगीति वगैरे छंदात व साकीत भेद असा आहे की, आर्यादींचा यति १२ व्या मात्रेवर असतो व साकीचा यति १६ व्या मात्रेवर असतो. साकीचे चार चरण धरले, तर पहिल्या व तिसऱ्या चरणांत सोळा मात्रा व दुसऱ्या व चवथ्या चरणांत बारा मात्रा होतात. म्हणजे, साकीचे पहिला व तिसरा असे दोन चरण मात्रासमकाचे असतात व दुसरा व चवथा असे दोन चरण आर्येचे असतात. सारांश, साकीचे नाव व कल्पना ही वैदिक शक्करी छंदावरून घेतली आहेत. फरक एवढाच की, मराठी साकीत समचरणांच्या अंती यमक असते व ५६ अक्षरांच्या ऐवजी ५६ मात्रा असतात.

६. दिंडी हा शब्द डिंडिम या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. डिंडिम = डिंडिअ = दिंडिअ = दिंडी. डिंडिम हे वाद्यविशेष आहे, त्याप्रमाणे ज्याचा नाद कल्पनेने भासतो तो छंद दिंडी होय. नावावरून दिसते की, हा छंद महाराष्ट्री भाषेतून मराठीत घेतला असावा. दिंडी चतुष्मादात्मक असून, प्रतिपादी १९ मात्रा असतात, अंत्य अक्षर सदा गुरू असते व यति नवव्या मात्रेवर असतो. उदाहरणः-

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| (१७) | क | थ | न | सु | ब | क | क | रि | न |
| | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १७ | १९ | |
| | म | धु | र | अ | म | र | धा | रा ।। | |
| | १ | २ | ३ | ५ | ७ | ९ | | | |
| (१४) | भ | व | ति | शृं | गा | रा | | | |
| | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १७ | १९ | |
| | क | रु | ण | र | स | चि | था | रा ।। | |
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| (१५) | नि | ष | ध | न | र | प | ति | न | ळ |
| | ११ | १२ | १४ | १५ | १७ | १९ | | | |
| | ना | म | धे | य | हो | ता | | | |
| | २ | ३ | ५ | ७ | ९ | | | | |
| (११) | वी | र | से | ना | चा | | | | |
| | ११ | १२ | १४ | १५ | १७ | १९ | | | |
| | सू | नु | थो | र | क | र्ता | ।।१।। | | |

ढक्का, निःसाण, दुंदभि, भेरी, वगैरेंच्या नादावर पद्ये म्हणण्याची पाचव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत चाल होती असे दिसते. त्याप्रमाणेच, डिंडिम वगैरेंच्या नादावर म्हटल्या जाणाऱ्या विशिष्ट पद्याला डिंडिम ऊर्फ दिंडी म्हणतात.

७. घनाक्षरी म्हणजे असे वृत्त की, ज्याच्या प्रत्येक त्रिकलात्मक गणांत एक अक्षर नियमाने दीर्घ असले पाहिजे व ज्याच्या प्रत्येक पादांत अक्षरे एकतीस असली पाहिजेत. प्रत्येक पादांत आठव्या, सोळाव्या व चोविसाव्या अक्षरांवर यति असून ती अक्षरे सयमक व लघु असतात. या वृत्ताच्या प्रत्येक पादांत (सव्विसांहून जास्त म्हणजे) एकतीस अक्षरे असल्यामुळे हे वृत्त दंडक आहे. दंडक म्हणजे व्यूह. ज्या त्रिकलात्मक गणात एक अक्षर नियमाने दीर्घ असते व त्या गणाचे व्यूह ज्या वृत्तांत एकापुढे एक बाराहून जास्त असतात त्याला घनाक्षरी दंडक म्हणतात. मराठी घनाक्षरीच्या प्रत्येक पादांत असे व्यूह पंधरा असतात व शेवटी एक गुरू अक्षर असते.

अगा कैकयी ग काय, कृती तुझी हाय हाय,

म्हणूं कसा तुला माय, व्यर्थ देह वैरि-णी! ।

सर्व जगासि जो काम्य, धाडियला वना राम,

करी जगीं दुष्टनाम, घोर भर्तृमारिणी ! ।।

न दुर्वधानें अधर्म, तुला वधाचेंचि धर्म,

परी नावडेल कर्म, रामनृपा पापिणी ! ।

आन तरी प्राण आज्य, तुझें घालुनियां प्राज्य,

जाळुनियां सामराज्य, दुःख शमे सर्पिणी ।।

घनाक्षरी दंडक असल्यामुळे तिच्या प्रत्येक पादांत अष्टाक्षरात्मक प्रपादाच्या तीन आवृत्त्या व सप्ताक्षरात्मक प्रपादाची एक आवृत्ती असते. अनुष्टुभाव्यतिरिक्त अष्टाक्षरात्मक वृत्ते एकंदर २५६ आहेत (वृत्तरत्नाकर). त्यांतून समानिका, प्रमाणिका, माणवक व वितानाचे कित्येक प्रकार, यांच्या पादांच्या स्वतंत्र किंवा ससंकर आवृत्त्या घनाक्षरीच्या पादांत होऊ शकतात. मिळून घनाक्षरीचे चार पाच हजार प्रकार होतात. समानिकात्मक घनाक्षरीचा प्रकार असा :

तूमचा मि दास त्य, जें कराल पारपत्य,

मान्य तें सुखास द्याल, योग्य तें तुम्ही करा ।

प्रमाणिकात्मक घनाक्षरीचा पाद असा :

अशाश्वतासि वंदितां, व शाश्वतासि निंदितां,

असें स्वतांच वागतां, म्हणूनिया घोरतां ।

माणवकात्मक घनाक्षरी अशी :

नित्य नव्हे त्याकरितां, कां झटता कां श्रमतां,

जा भगवन्नाम वदां, निर्भय गा दास हो ।

ज्या घनाक्षरीच्या प्रत्येक त्रिकलात्मक गणांत एक दीर्घ मात्रा असते ती घनाक्षरी अन्वर्थक होय. परंतु अशी शुद्ध निर्भेळ घनाक्षरी किंवा तिचा पाद किंवा प्रपाद मराठी कवितेत फारच स्वल्प प्रमाणाने सापडतो. प्रपादाच्या आठ अक्षरांतून चार अक्षरे गुरू व चार लघू एका आड यावी, असा घनाक्षरीचा शब्दार्थ आहे खरा; परंतु, मराठी कवी हा निर्बंध पाळण्यापेक्षा नियमाने मोडताना आढळतात. याचा अर्थ असा की, समानिकादिव्यतिरिक्त जी अष्टाक्षरात्मक अनुष्टुभादि वृत्ते त्यापैकी कित्येकांचे चरण घनाक्षरी रचण्याला मराठी कवी घेतात. जसे :

म्हणे भरत हा राम, त्राहे त्राहे मेघश्याम,

वसिष्ठ हा गुरूनाम, तो ही मज कोपला ।

प्रपाद असा छापावयास पाहिजे होता :

म्हणे भरत हा राम, त्राहि त्राहि मेघश्याम,

वसिष्ठ हा गुरूनाम, तो हि मसी कोपला ।

म्हणजे 'भर' एवढा एकच गण काय तो दुष्ट राहिला असता. उच्चारताना 'भर'मधील 'र' हेल काढून दीर्घ उच्चारला जातो ही गोष्ट निराळी.

याच घनाक्षरीचा दुसरा पाद घेतो :-

अंतरले तुझे पाय, तया राज्याचे उपाय,
सांगे मज हाय हाय, नव्हे गुरू आपला ।

येथे 'ज्या' व 'गे' ही अक्षरे लघु व 'ज' गुरू उच्चारला पाहिजे, व ती तशी म्हणताना उच्चारिली जातात.

आता एक मोरोपंताची घनाक्षरी घेतो.

मुनी गुरू म्हणे हाण, तोंचि सोडुनी सुबाण,

ताटकेचे हरी प्राण, राम लावि न क्षण ।

येथे 'चे' ऱ्हस्व व अंत्य 'ण' दीर्घ उच्चारले पाहिजेत व म्हणण्यात ते तसे उच्चारले जातात.

सिद्धाश्रमीं निशाचर, सुबाहु प्रमुख खर,

संहरी हणोनि शर, करी यज्ञरक्षण ।

येथे प्राकृत नियमाप्रमाणे 'द्ध' मुळे 'सि' गुरू झाला नाही. परंतु संस्कृताप्रमाणे 'प्र' मुळे 'हु' गुरु झाला आहे. संयुक्ताक्षरपरत्वाने पूर्वाक्षराचे गुरुत्व मराठीत विकल्पाने होते, हे प्रसिद्ध आहे. तसेच 'च', 'मू', 'ख', 'श' व 'ण' ही अक्षरे गुरू उच्चारिली आहेत व ती तशी म्हणण्यात उच्चारतात.

सारांश, शुद्ध घनाक्षरीच्या त्रिकलात्मक प्रत्येक गणात एक गुरू मात्रा अवश्य असावी लागते; आणि या असाधारण धर्मावरूनच तिला घनाक्षरी (गुर्वक्षरी) हे नाव प्रारंभी मिळालेले आहे.

घनाक्षरीच्या चारी पादांच्या म्हणजे चरणांच्या अंती एकच यमक असते. त्यावरून इतर वृत्तांप्रमाणे घनाक्षरी दंडकाला चार चरण असतात हे उघड होते. प्रत्येक चरणात तीन यमके असतात. यमकपूर्व अष्टाक्षरात्मक अक्षरसंघ ओवीच्या ओळीप्रमाणे लिहितात, यामुळे घनाक्षरीला सोळा चरण आहेत, असा भास होतो. परंतु प्रत्येक चवथा चरण सप्ताक्षरात्मक आहे, हे पाहिले म्हणजे तिचे खरे स्वरूप कळते.

येणेप्रमाणे घनाक्षरी ही दंडक आहे व इतर दंडकांप्रमाणे ती मराठीत संस्कृतातून घेतली आहे. गोडबोल्यांच्या वृत्तदर्पणात ज्या घनाक्षऱ्या छापिल्या आहेत, त्यातील अक्षराचे लघुगुरुत्व अस्सल पोथ्यांवरून पाहून छापलेले नाही; अलीकडील गद्य शुद्धलेखनाच्या नियमांप्रमाणे छापलेले आहे. त्यामुळे त्याचे छंदस्त्व विनाकारण भ्रष्ट झालेले दिसते.

पिंगलाच्या घनाक्षरीचे लक्षण रामदयालूने वृत्तचंद्रिकेत असे दिसले आहे :

विचारचर्चा गलयोर्गणानां

न यत्र, भूपै १६ स्थितिभि १५ र्यतिर्गुरु ।।

अंते धरापावक ३१ वर्णपादा
समीरिताऽसौ फणिना घनाक्षरी ।।

पादांत ३१ अक्षरे व १६ व्या अक्षरावर यति, एवढाच निर्बंध या घनाक्षरीला आहे. मराठी घनाक्षरीच्या पादांत यति प्रत्येक ८ व्या अक्षरावर असून, प्रत्येक अक्षरद्वंद्वांत एक अक्षर घन म्हणजे दीर्घ असावे लागते. संस्कृत घनाक्षरीत गुरुलघूंचा निर्बंध नाही. तेव्हा ते लक्षण जर मराठी घनाक्षरीला लाविले, तर गुरुलुघु मात्रांची भानगड नाहीशी होते.

रामदयालूने बत्तीस अक्षरांचीही घनाक्षरी सांगितली आहे; परंतु तिचा प्रचार मराठीत अद्याप नाही.

८. कटिबंध अथवा कटाव पद्यापेक्षा संगीतात जास्त मोडत असल्यामुळे त्यासंबंधाने येथे विशेष चर्चा करीत नाही. प्रारंभी एखाद्या पदाची ओळ घेतात आणि नंतर विराटू, पणव वगैरे छंदांच्या चरणाच्या हव्या तितक्या आवृत्त्या पुढे जोडतात व शेवटी मूळ पदांवर येतात. मुदंग, पणव, डग्गा वगैरे वाद्यांच्या साथीवर कटाव म्हणतात.

९. ज्या छंदांत भंग नाहीत तो अभंग, भंग म्हणजे कर्णमधुर गण. अर्थात, अभंग म्हणजे गणविहीनवृत्तात्मक समचरण किंवा विषमचरण छंद. अभंगाच काही प्रकार खाली देतो व नंतर त्यांच्या संबंधाने विवेचन करतो.

(१) तीन शिरें, सहा हात, तया माझे दंडवत
काखे झोळी, पुढें श्वान, नित्य जान्हवीचें स्नान
माथां शोभे जटाभार, अंगीं विभूति सुंदर ।।३।। (४)
शंख चक्र गदा हातीं, पायीं खडावा गर्जति ।।४।।
तुका म्हणे दिगंबर, तया माझा नमस्कार ।।५।।

(२) राजा करी तैसे दाम, तेहि चाम चालती ।।१।।
कारण ते सत्ता शिरीं, कोण करी अव्हेर ।।२।। (४)
वाइलें तें सुलें खांदीं, चाले पदीं बैसलें ।।३।।
तुका म्हणे विश्वंभरें, करुणाक्षें रक्षिलें ।।४।।

(३) काय बोलों सांगा, याउपरी पांडूरंगा ।।१।।
कांहीं आधारावांचून, पुढें न चले वचन ।।२।। (४)✻
वाढे ऐसा रस, कांहीं करावा सौरस ।।३।।
भक्तिभाग्यसीमा, द्यावा जोडोनीयां प्रेमा ।।४।।
कोरड्या उत्तरीं, नका गौरवूं वैखरी ।।५।।

✻ हे विषमचरणी अभंग आहेत.

करी विज्ञापना, तुका प्रसादाच्या दाना ।।६ ।।

(४) याची सवे लागली जीवा, गोडी हेवा संगाचा ।।१ ।।

(५) धांव धांव गरुडध्वजा, आम्हां अनाथांच्या काजा ।।२ ।। (४)*

(६) बहू जालों कासावीस, म्हणोनि पाहे तुझी वास ।।३ ।।

(७) पंढरीस जावें, जीवनमुक्त व्हावें, केशवा भेटावें, जीवलगा ।।१ ।। (६)

(८) जगाच्या कल्याणा, संताच्या विभूती, देह कष्टवीती, उपकारें ।।१ ।।

(९) गजइंद्र पशु भासें मोकलीला, तो तुज स्मरला पांडूरंगा ।।१ ।।(६)*

(१०) आलिया अतीतां म्हणतासां पुढारें, आपुलें रोकडें सत्त्व जाय ।।१ ।।

(११) आम्हीं जाणावें ते काई, तुझें वर्ण कोणे ठायीं,
अंतपार नाहीं नाहीं, ऐसें श्रुती बोलती ।।१ ।।(८)

(१२) अकरावरी सातवें होतें, सातवें कोठें मावळलें ।।१ ।। (५)

(१३) चातकेविण लक्ष अंतरींच ठसलें, तेथें एक बोळलें ब्रह्ममेघ ।।१ ।।

(१४) ज्ञानदेव वैष्णव मोठा, विठ्ठलनामें मुक्तपेठा,
स्नानदान घडेरे श्रेष्ठा, वैकुंठ वाटा संत गेले ।।१ ।। ९

(१५) आकार स्थूळ नाशिवंत, हे तरि जाइल भूति आंत,
तयावरी हरि चालत, तेणें होईल कृतकृत्य ।।१ ।। (९)

(१६) लावण्य मान्यता विद्यावंत, सखेस्वजन पुत्रकलत्र
विषयभोग वयसा व्यर्थ, देहासहित मरणावर्ती ।।१ ।। (१०)

(१७) जागृतीमध्यें कवण जागत, सुषुप्तीमध्यें कवण निद्रिस्त
दोघे भ्रमलिया स्वप्नदेखत, जीव कीं मन सांग पा ।।१ ।। (११)

(१८) वऱ्हाड न होतां होतो खेळेमेळें, लगन लागलें कवणें दृष्टवेळे
तेथुनि अबोला चालवीतो माते, कैसेनि येथें निस्तरावें ।।१२ ।।

(१९) * नवलावो जालें, (६)
जग हरिच होउनि ठेलें । (१०)
आठऊं विसरलें, (७)
काय करूं ।।१ ।। (४)

(२०) * सरिता ना संगम, (७)
ओघ ना भ्रम ।। (५)
नाहीं क्रियाकर्म (६)
तैसें जालें ।।१ ।। (४)

* हे विषमचरणी अभंग आहेत.

१०. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व तुकाराम यांचे अभंग पाहाता असे दिसते की, अभंगाचे एकपासून शंभर दोनशेपर्यंत हवे तितके चौक असतात. प्रत्येक चौकात चार, साडेतीन किंवा पावणेचार, चरण असतात. चरणांत चारापासून चौदापर्यंत अक्षरे असतात.

## ११ प्रतिष्ठा अभंग

(अ) पैकीं चतुरक्षरचरणात्मक चौकासंबंधी माहिती येणेप्रमाणे :

चौकात चरण चार. चरणांत अक्षरे चार, गुरू किंवा लघु. चौकात अक्षरे सोळा. हा संस्कृतातील पिंगलोक्त प्रतिष्ठा छंद होय. प्रतिष्ठेचे प्रकार १६ आहेत. तेव्हा चतुरक्षरचरणात्मक अभंगाच्या चौकाचे प्रकार ४०९६ होतात. म्हणजे चतुरक्षरचरणात्मक अभंगाला प्रतिष्ठा अभंग म्हटले असता योग्य होणार आहे. प्रतिष्ठा अभंगाचे सर्वलघु उदाहरण असे :

मटमट । गटगट । दधिपय । उडवित ।।१।।

प्रतिष्ठा अभंगाचे सर्वगुरू उदाहरण असे :

माझे मामा । तुके काका । टाळी बाप्पा । ऐशा लोकां ।।११।।

या प्रतिष्ठेला संस्कृतांत तीर्णा किंवा कीर्णा म्हणतात.

वर अभंगाचे वीस प्रकार दिले आहेत. त्यांपैकी पहिल्या प्रकारातील सर्व अभंग प्रतिष्ठा छंद आहेत. ते लघुगुरुभेदाने ४०९६ तील कोणत्यातरी भेदांत पडतील.

(आ) कित्येक प्रतिष्ठा अभंगाच्या चवथ्या चरणांत तीनच अक्षरे असतात; म्हणजे एकच अक्षर चरणपूर्तीला कमी असते; म्हणजे पाऊण चरण असतो. अशा अभंगाला पादोनप्रतिष्ठा अभंग म्हणावे. उदाहरण, उपरिनिर्दिष्ट वीस प्रकारांपैकी दुसऱ्या प्रकारातील सर्व अभंग अथवा,

सर्व लघु : - मज अति । गडबड । बिलकुल । नसत ।।१।।

सर्व गुरू : लोकांसाठी । क्षणोक्षणीं । माया खर्ची । निर्वाणीं ।।१।।

या छंदाला वैदिक भाषेनें निचृत्प्रतिष्ठा म्हणता येईल. या निचृत्प्रतिष्ठेचे ३३७५ भेद होतील.

(इ) प्रतिष्ठेचे (१) चारही चरण, किंवा (२) मधले दोन चरण, किंवा (३) दुसरा व चवथा चरण, किंवा (४) पहिले तीन चरण सयमक असले म्हणजे आणिक चार भेद होतात. परंतु हे स्वरूपभेद नव्हत तेव्हा तन्निष्ठ प्रकार मानणे मुद्याचे नाही.

(उ) प्रतिष्ठा अभंगांत कधी कधी दुसरा चरण अर्धाच लिहितात. परंतु म्हणताना चरणातील अंत्य अक्षरद्वयाची द्विरूक्ती करतात. जसे :-

भावें भावें गीत शुद्ध करोनियां चित्त ।।१।।

किंवा

काय बोलो सांगा, याउपरी पांडुरंगा ।।१।।

येथे 'गीत' व 'सांगा' ही अक्षरद्वये दोनदा उच्चारावयाची आहेत. निचृत्प्रतिष्ठा अभंग वैदक ऊनाक्षर छंदाचे अनुकरण आहे हे लक्षात ठेविले पाहिजे.

## १२. सुप्रतिष्ठा अभंग

या अभंगाचे वर्णन असे :-

चौकांत चरण चार. चरणांत गुरूलघु अक्षरे पाच. चौकात अक्षरे २०. चौथा चरण ऊनाक्षर असल्यास १८ किंवा १९. गुरुलघुत्वेकरून भेद ३२७६८- ऊनाक्षर असल्यास ९८३०४.

उदाहरण :-

अकरावरी । सातवें होतें । सातवें कोठें । मावळलें ।।१ ।।

ह्न ज्ञानेश्वर

अथवा

कापूस मोठा । दाठर आहे । मार न साहे । गिरणीचा ।।१ ।।

अथवा

जी भर्तृभक्ता । धर्मैकचित्ता । ती होय कांता । धन्य जनीं ।।१ ।।

## १३. गायत्री अभंग

चौकांत चरण चार. चरणी गुरुलघु अक्षरे सहा. चौकात अक्षरे २२. चौथ्या चरणात चार अक्षरे. गुरुलघुत्वे भेद लक्षावधि. उदाहरण :-

जगाच्या कल्याणा । संताच्या विभूती । देह कष्टवीती । ऊपकारें ।।१ ।।
मना थोर इच्छा । संसारीं कर्माची । मला बेकारीची । खंती वाटे ।।१ ।।
गिरिवरकन्या । कलयतु धन्या । तव शुभमन्या । किं कार्या रे ।।१ ।।
परवर झालें । बहु जरि गोडें । तरि जन वेडें । द्राक्षीं सक्त ।।१ ।।

शेवटल्या दोन चौकाचे तीन चरण शशिवदना वृत्ताचे आहेत. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम हे चार हा षडक्षरचरणात्मक विचृत् गायत्री अभंग छंद फार योजतात. इतका की त्याचे तीन चतुर्थांश अभनग या छंदांत आहेत. या छंदाचे लक्षण नामदेवाने असे दिले आहे-

अभंगाची कळा । कांहीं मी नेणत । त्वरा केली प्रीत । कशोराजे ।।१ ।।
अक्षरांची संख्या । बोलिलों उदंड । मेरु तो प्रचंड । शर आर्दी ।।२ ।।
सहा साडेतीन । चरण जाणावे । अक्षरें मोजावे । चौक चारी ।।३ ।।
पहिल्या पासूनि । तिसऱ्या पर्यंत । अठरा गणीत । मेज आली ।।४ ।।
चौक चारी आर्दी । बोलिलों मातृका । सा विसाची संख्या । शेवटील ।।५ ।।

दीड चरणाचीं । दीर्घ तीं अक्षरें । सूक्ष्म विचारें । बोध केलें ।।६ ।।
नामा म्हणे एक । शून्य दिलें हरीं । प्रीतीनें खेचरीं । आज्ञा केली ।।७ ।।

वरील अभंगांत साडेतीन चरण, दरचरणी सहा अक्षरे, शेवटल्या दीड चरणाची सर्व अक्षरे दीर्घ, पहिल्या तीन चरणांची एकंदर अक्षरे अठरा वगैरे बाबी सांगितल्या आहेत; त्यावरून असे दिसते की, अभंग छंदाला इतर संस्कृत वृत्तांप्रमाणे गण, मात्रा व नियमित अक्षरे असतात, असे नामदेवाला विसोबा खेचराने सांगितले होते. षडक्षरी अभंगच नामदेवाने फार रचिल्यामुळे, त्याने याच एकट्या अभंगाचे लक्षण दिले आहे. खेरीज नामदेवाने ९६ कोट अभंग रचिले. त्यांपैकी काही हजार अभंग छापले आहेत. उरलेल्यांत इतर अभंगांची लक्षणे नामदेवानी दिली असण्याचा संभव आहे.

## १४. उष्णिग् अभंग

अभंगांचे चरण चार, दरचरणी अक्षरे सात, अंत्य चरणांत अक्षरे चार. लगत्वे भेद लक्षाविध उदाहरण :

चातकेविण लक्ष । अंतरींच ठेलें ।
तेथें एक वोळलें । ब्रह्ममेघ ।।१ ।।
गुरु जन सेवक । बहुगुण संपन्न ।
असे पुत्र कुलीन । तीची धन्य ।।१ ।। - ज्ञानेश्वर
कृष्णाप्रती गोपाळ । म्हणताती सकळ ।
न कळसी अकळ । अताताता ।।१ ।। - नामदेव

## १५. अनुष्टुब् अभंग

अभंगाचे चरण चार, प्रतिचरणी अक्षरे आठ, चौथ्या अक्षरावर यति, अंत्यचरणी अक्षरे सात, लगेच भेद लक्षावधी. उदाहरण :

आम्हीं जाणावें ते काई । तुझें वर्म कोण्या ठाई ।
अंत पार नाहीं नाहीं । ऐसें श्रुती बोलती ।।१ ।। - ज्ञानेश्वर
अशाश्वतासिक वंदितां । व शाश्वतासि निंदिता ।।
असे स्वतांच वागतां । दुःखे दग्ध तुम्ही हो ।।१ ।।
माय बाप भाऊ पुत्र । सर्व सोयरे कलत्र ।
मूळ मानिती विचित्र । हा संसार बापया ।।१ ।।
सेवा करावया लावा । देवा हा योग्य चाकर ।
या तप्ताच्या शिरीं भार । अतोनात जाहाला ।।१ ।।

शेवटल्या तीन अभंगांचे पहिले तीन तीन चरण प्रत्येकी प्रमाणिका, समानिका व अनुष्टुब् छंदाचे आहेत. पहिल्या अभंगाचा पहिला चरण विद्युन्मालेचा आहे.

## १६. बृहती अभंग

अभंगांत चरण चार. चरणी अक्षरे नऊ, पांचव्या अक्षरावर यति, चौथा चरण नऊ किंवा नवांहून कमी अक्षरांचा. गलभेदे भेद लक्षावधी. उदाहरण :

ज्ञानदेव वैष्णव मोठा । विठ्ठलनामें मुक्त पेठा ।
स्नानदान घडे रे श्रेष्ठा । वैकुंठवाटा संत गेले ।।१।। - ज्ञानेश्वर
आकार स्थूल नाशिवंत । हे तरी जाईल भूति आंत ।
तयावरी हरि चालत । तेणें होईल कृतकृय ।।१।। - ज्ञानेश्वर
आकार स्थूल नाशिवंत । हे तरी जाईल भूति आंत ।
तयावरी हरि चालत । तेणें होईल कृतकृय ।।१।। - ज्ञानेश्वर

## १७. पंक्ति अभंग

चार चरण. चरणी अक्षरे दहा. पाचव्या अक्षरावर यति. चौथ्या चरणी अक्षरे दहा किंवा नऊ. भेद लक्षावधी. उदाहरण :

लावण्यमान्यता विद्यावंत । सखे स्वजन पुत्रकलत्र ।
विषयभोग वयस्त व्यर्थ । देहासहित मरणावर्ती ।।१।। - ज्ञानेश्वर

## १८. त्रिष्टुब् अभंग

चार चरण. चरणी अक्षरे अकरा. पाचव्या किंवा सहाव्या अक्षरावर यति. चौथ्या चरणी अक्षरे अकरा किंवा कमी. लगत्वे भेद लक्षावधी. उदाहरण :

जागृतीमध्यें कवण जगत । सषुप्तिमध्यें कवण निद्रिस्त ।
दोघे भ्रमलीया स्वप्न देखत । जीव कीं मन सांग पा ।।१।। - ज्ञानेश्वर
संपदा असे बहुत ज्या घरीं । खावया तिथे मिळति बापुडी ।
द्रव्य संपता पळति माकुडी । कोणि राहिना जवळ ।।१।।
यदुपतिपदिं या मनास रे । धरि तरि वासना सरें ।
मिळतिल तुज मोक्षपंथ रे ।। येर वासना धरूं नको ।।२।।

शेवटल्या दोन अभंगांचे पहिले तीन चरण अनुक्रमे ललित व भद्रिका वृत्ताचे आहेत. पहिल्या अभंगाचा पहिला चरण ललिताचा आहे.

।। श्री विश्वनाथो विजयते ।।

## १९. जगती अभंग

चरण चार. चरणी अक्षरे बारा. सहाव्या अक्षरावर यति. चौथ्या चरणी अक्षरे कमी. भेद लक्षावधि, उदाहरण :-

वऱ्हाड न होता होतो खेळमेळे । लग्न लागले कवणे दुष्टवेळे ।
तेथुनि अबोला चालवितो मातें । कैसेनि येथें निस्तरावें ।।१ ।। -ज्ञानेश्वर
मना साजणा हो हरीसी भजावें । घरासी असावें गरीबां पुसावें ।।
तरी तूज देवो सदा भेट देई । दुरावेल नाहीं तरी बाप्पा ।।१ ।।
तया नीं होतिं बहुत राक्षसें । दया तयांना न वधित माणसें ।
तयास सीता वदते परोपरी । क्रूर ते उत्तरीं बोभाटत ।।१ ।।
सौख्य होतें मना ईश्वरीं योजितां । जाणसी हे जना तत्पदीं लागतां ।
तारितो तो भवांतून हें निश्चियें । गा कसा नेणसी । सांग रया ।।१ ।।

शेवटल्या तीन अभंगांचे तीन चरण अनुक्रमे भुजंगप्रयात, वंशस्थ, स्रग्विणी वृत्तांचे आहेत.

२०. तीन चरण समाक्षर ज्यांत आहेत ते अभंग येथपर्यंत दिले. विषमचरणी अभंगाचे मासले पहावयाचे असल्यास, ते नवव्या कलमांतील ४, ५, ६, १९ व २० हे होत. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम हे विषमाक्षर अभंग बहुत रचतात.

२१. समचरणी व विषमचरणी अभंगांहून निराळा असा एक खोटा प्रकार अभंगांचा आहे. हे अभंग वस्तुतः पदे असून, यांना अभंग हे केवळ औपचारिक पद्धतीने दिलेले असते. ज्ञानेश्वर अभंग रचतो, तेव्हा तो जी पदे रचतो तीही अभंगांच्या नावाखालीच मोडतात. सारांश, असली पदे संगीतातच स्वरूपतः समावेशिली पाहिजेत.

२२. एका चौकापासून शंभर दोनशे चौकांपर्यंत अभंग असतात. ज्याअर्थी प्रत्येक चौक सबंध चार चरणी किंवा साडेतीन चरणी श्लोक आहे त्या अर्थी चौक कितीही आले तरी त्यांत विपरीत असे काहीच नाही. प्रायः एकजुटीतील सर्व चौकांत एकाच विषयाचे प्रतिपादन असते.

२३. छंदांचे भेदप्रभेद अब्जावधी आहेत. त्यांतून कर्णमधुर व पठणाला सुलभ असे चारपाचशे प्रकार छंदशास्त्रज्ञांनी व ललितपदलोलुप कवींनी निवडून घेतले. ती निवड संस्कृत भाषेच्या रूपांतराबरोबर रूपांतरित झाली. तो प्रकार स्थूलमानाने असा : पाणिन्यादि वैय्याकरणांच्या पूर्वी जी आर्ष भाषा होती, तिची सुप्तिङ्त् रूपे अनियमित असत आणि उच्चार व स्वर पाणिनीय संस्कृताहून बरेच निराळे असते. लघुगुरूंचा निर्बंध कायमचा ठरलेला नव्हता. त्यामुळे आर्ष छंदोरचना ज्ञानेश्वरकालीन

मराठी अभंगरचनेप्रमाणे फार विषमाक्षरचरणमय असे. पुढे व्याकरणादिकांनी आर्ष भाषा जसजशी नियमित होऊ लागली आणि नागर भाषण अभिजात लोक जास्त जास्त प्रचारांत आणू लागले, तसतशी छंदोरचनाही नियमित, समाक्षरक व ललित होऊ लागली. जिव्हेला सहजग्राह्य व कर्णमधुर असे छंद संस्कृतलोकमान्य झाले आणि अग्राह्य जे लक्षावधी इतर छंदोभेद ते असंस्कृत लोकांना म्हणजे सामान्य जनांत चालू राहिले. म्हणजे आर्ष छंदोरचना सामान्य जनात प्रचलित होती, ती तशीच राहिली. कारण सामान्य जनांची जी प्राकृत भाषा, ती आर्ष भाषेप्रमाणेच अनियमित होती. अथवा, सामान्य जनांची प्राकृत भाषा रूपांतरित आर्ष भाषाच होती, असे म्हटले असता वस्तुस्थितीला धरून बोलल्यासारखे होईल. आर्ष-पाली-महाराष्ट्री-मराठी अशी परंपरा असल्यामुळे, अनियमित, विषमारक्षक व ऊनाक्षरमय अशी छंदोरचना मराठीत- जुन्या मराठीत व नव्या मराठीत- परंपरेने आली. ती अद्यापही तशीच चालली आहे.

२४. मराठीत छंदोरचना बायकापोरांच्या खेळाच्या गाण्यात व कहाण्यातही दृष्टीस पडते. त्याचे काही मासले खाली देतो :

(१) एक्कल काज दुह्रिबिराजा — चंपकमालावृत्त

(२) अव्डक् चवडक् दामाडू
दामाडूचा पंचाडू — सप्ताक्षरी समानिका

(३) ये रे ये रे पौसा ।
तुला देई पैसा ।
पाऊसाला मोठा
पैसा झाला खोटा ।।१।। — षढरक्षक शेषच्छंद

मुलांच्या उजळणीचे पाडेही याच छंदांत आहेत; मात्र अंत्य अक्षर लघु लिहितात, परंतु हेल काढून गुरू म्हणतात :

एकीं एकीं एक
एकीं एकीं दोन
एकीं तिकीं तीन — शेषच्छंद

एकीं चौकीं चार

शंकरापुढील नंदीला उद्देशून हा छंद म्हणतात ह

नंदी नंदी नंदुक्लें

नंदीचें हें अंडुक्लें

} शेषच्छंद

गाईचा श्लोक

गाय गायित्री

म्हैस सावित्री

} रगौगः

या छंदाला प्राकृत पिंगलांत व छंद कौस्तुभांगत नाव नाही; परंतु हे चरण

गाय गायिती

म्हैस साविती

} गुराखी असेच उच्चार करतात

असे लिहिल्यास, विदग्धक छंद होतो.

अप्पा ।
धोप्पा ।
वेणी ।
वेणी ।।

} हा द्व्यक्षरमय कामच्छंद आहे. तृतीय चरण द्विरुक्त आहे

गोप्पा ।।
आलंजो
पालंजो

} त्र्यक्षरप्रस्तारे तालीच्छंद

हे गाणे अथवा छंद शुद्ध महाराष्ट्रीतून व संस्कृतातून घेतले आहे. ओलंज् उत्क्षेपे. पायावर मूल उडविताना हा छंद म्हणतात. हा गाण्यावरून मराठीची परंपरा ओळखता येते.

येणेप्रमाणे दोनपासून अधिक अक्षरांचे समाक्षरी व विषमाक्षरी छंद मराठीत लक्षावधी आहेत. पैकी चतुरक्षरी चरणांपासून द्वादशाक्षरी चरणांपर्यंतच्या अभंगांची उदाहरणे व लक्षणे वर दिली आहेत. कित्येक अभंगांच्या चरणात तेरा किंवा चौदाही अक्षरे सापडतात. परंतु असे चरण विरळ. चौदा अक्षरांहून जास्त अक्षरे अभंगांच्या चरणात येत नाहीत. सारांश, चतुरक्षरी वृत्तांपासून चतुर्दशाक्षरी वृत्तांपर्यंत जेवढी म्हणून लक्षावधी वृत्ते आहेत, ती सर्व अभंग आहेत. इतकेच की, अभंगत्व प्राप्त होण्याला या वृत्तांच चवथा चरण ऊनाक्षरक असावा लागतो. ओवीलाही हाच सिद्धान्त कमजास्त लागू पडतो, हे पुढील तपशिलावरून दिसून येईल.

२५. शक १५६० त मुऱ्हारिमल्लुबास नामेंकरून कोणी मानभाव ग्रंथकार झाला. त्याने रचलेल्या दर्शनप्रकाश नामक ग्रंथांत ओवी या अर्थी ''ओवाणिका'' शब्द येतो. हा ग्रंथ पुणे येथील चित्रशाळेत इ.स. १९०१ त दत्तराज आराध्ये पेशावरकर यांनी प्रसिद्ध केला. ऊञ् = सूत्र ओवणे, या धातूपासून ओवी हा शब्द निघाला आहे.

आ + ऊयन = ओयन = ओयनिका.
ओयनिका = ओवणिका = ओवइआ = ओवीआ = बोवीया
= ओंवीया = ओंवी = ओवी.

अथवा
वे (ओवणे, ग्रंथरचना करणे) या धातूपासून नाम ऊति.
आ + ऊति = ओति = ओइ = वोवी = वोंवी = ओंवी.

अशीही सिद्धी होऊ शकेल. परंतु, ओवणिका हा शब्द ज्याअर्थी शक १५६० तील दर्शन प्रकाश ग्रंथात आला आहे, त्याअर्थी पहिलीच व्युत्पत्ती ग्राह्य दिसते.

अभंगामध्ये चार किंवा साडेतीन चरण एकदम म्हणतात व त्या सगळ्याला चौक म्हणतात; ओवीत प्रत्येक चरण निराळा म्हटला जातो. अभंगात चरणाचे उपांत्य अक्षर हेल काढून प्लुत म्हणतात. ओवीत चरणाचे अंत्य अक्षर प्लुत म्हणतात. प्रायः अभंगाचे सर्व चौक एकाच छंदात असतात. प्रत्येक ओवी स्वतंत्र असल्यामुळे दुसऱ्या ओवीशी छंदोदृष्ट्या तिचा काहीएक संबंध नसतो. पुढील ओवी मागील ओवीच्या छंदाची असण्याचे काहीच कारण नसते. अभंग सर्व प्रकारे छंदोमय आहे. ओवीचा ओढा पद्यापेक्षा गद्याकडे विशेष असतो. प्रायः अभंगाच्या चौकाच्या पहिल्या तीन चरणांत नियमित अक्षरे असावी लागतात. ओवीत अक्षरांचा नियम नसला तरी खपतो. पहिल्या तीन चरणान्ती यमक साधले म्हणजे ओवीचे काम झाले. म्हणजे ओवी समयक गद्य आहे. सयमक गद्याचा प्रकार मराठीतच तेवढा आहे असे नाही. पाश्चात्त्य भाषांतही हा प्रकार आहे. याला Alliterative, Rythmical व Rhymng Prose अशी संज्ञा तत्रस्थ भाषांत आहे. उदाहरण :-

I went aroaming, when a horse came foaming, by cross-

Charing. The Street was crowdy and the people were rowdy. Besides the sky was cloudy, so I felt giddy.

या इंग्रजी सयमक किंवा सप्रास गद्यात व मराठी ओवीत भेद असा आहे की, मराठी ओवीत साडेतीन किंवा चार चरण असतात व प्रतिचरणाचे अंत्याक्षर हेल काढून प्लुत म्हणतात. इंग्रजी सप्रास गद्यात चरण वगैरे कशाचीच नड नसते. म्हणजे इंग्रजी सप्रास रचना गद्य आहे आणि मराठी सयमक ओवी पद्य आहे.

ओवीला चार चरण असतात. पैकी चौथ्या चरणात बाकीच्या कोणत्याही चरणापेक्षा अक्षरे कमी असावी लागतात. पहिल्या तीन चरणात प्रत्येकी पांचपासून अठरापर्यंत अक्षरे असतात. म्हणजे पहिल्या तीन चरणांपैकी प्रत्येक चरण सुप्रतिष्ठाछंदापासून धृतिछंदापर्यंतच्या कोणत्यातरी एका छंदाचा असतो आणि चौथा चरण मध्यमाछंदापासून जगतीछंदापर्यंतच्या कोणत्यातरी एका छंदाचा असतो. हे लक्षण किंवा अशाच सारखे लक्षण मानभाव लोकात शक १५०० च्या सुमारास झालेल्या भीष्माचार्य नामक ग्रंथकाराने मार्गप्रभाकर नामक ग्रंथाच्या ज्ञानखंडात येणेप्रमाणे बांधिले आहे.

ओवीचे लक्षण

१३) गायत्रीछंदापासौनि धृतिपर्यंत ।
१७) ग्रंथ वोवीयांचे तीन चरण जाणावे मिश्रित ।
१२) प्रतिष्ठेपासौनि जगतीपर्यंत ।
(५) चौथा चरण ।।४२७।। ज्ञानखंड, मार्गप्रभाकर.

या ओवीचा अर्थ असा : ओवीचे पहिले तीन चरण गायत्रीपासून धृतिपर्यंतच्या कोणत्याही छंदाचे असावे आणि चौथा चरण प्रतिष्ठेपासून गतीपर्यंतच्या कोणत्याही छंदाचा असावा. म्हणजे पहिले तीन चरण षडक्षरी वृत्तापासून अष्टादशाक्षरी वृत्तापर्यंतच्या कोणत्याही वृत्ताचे असावे आणि चौथा चरण चतुरक्षरी वृत्तापासून द्वादशाक्षरी वृत्तापर्यंतच्या कोणत्याही वृत्ताचा असावा. म्हणजे पहिल्या चरणांत ६ पासून १८ पर्यंत व चौथ्या चरणांत ४ पासून १२ पर्यंत अक्षरे असावी. ज्ञानेश्वराचे कित्येक ओवीचरण पाच अक्षरांचे सापडतात व चौथा चरण तीन अक्षरांचा सापडतो. म्हणून मी ओवीचे लक्षण असे बांधिले आहे की, ओवीचे पहिले तीन चरण सुप्रतिष्ठा (५) छंदापासून धृति (१८) छंदापर्यंतच्या कोणत्याही छंदाचे असतात आणि चौथा चरण मध्यमाछंदा (३) पासून जगती छंदा (१२) पर्यंतच्या कोणत्याही छंदाचा असतो. मात्र, येथे एक अट लक्षात ठेविली पाहिजे की, प्रायः चौथ्या चरणांतील अक्षरे पहिल्या तीन चरणांतील सगळ्यांत कमी अक्षराचा जो चरण असेल त्यातील अक्षरांहून जास्त असू नयेत. या सगळ्यांचा इत्यर्थ असा की, ओवीचे तीन चरण सुप्रतिष्ठेपासून धृतीपर्यंत जेवढी कोट्यवधी वृत्ते आहेत त्या वृत्तांचे

असतात व चौथा चरण मध्यमापासून जगतीपर्यंत जी लक्षावधी वृत्ते आहेत त्या वृत्तांचा असतो.

ओवी दोन प्रकारची असते, समचरणी व विषमचरणी. समचरणी ओवी ती की, जिच्या पहिल्या तीन चरणांत सम अक्षरे असतात आणि विषमचरणी ओवी ती की, जिच्या पहिल्या तीन चरणांत विषम अक्षरे असतात. समचरणी ओवीचे दोन प्रकार आहेत, समवृत्त व विषमवृत्त. समवृत्त ओवी ती की, जिच्या पहिल्या तीन चरणांत एकसारखे गण असतात आणि विषमवृत्त ओवी ती की, जिच्या पहिल्या तीन चरणात अक्षरे सम असून गण भिन्न असतात. प्रायः चौथा चरण कोणत्याही इतर चरणांहून अक्षरांनी लहान असतो, हे सांगितलेच आहे. प्रायः म्हणण्याचे कारण, कित्येक ओव्या क्वचित् अशा सापडतात की, त्यांत चौथा चरण इतर एखाद्या किंवा सर्व चरणांहूनही अक्षरांनी मोठा असतो.

समचरणी व समगणी ओव्या फारच क्वचित् आढळतात. विषमचरणी व विषमगणी ओव्यांची संख्या फार.

ज्ञानेश्वराव्यतिरिक्त जे ओवीप्रकार आहेत ते गायत्री (६) पासून धृति (१८) पर्यंतचे छंद योजतात. परंतु ज्ञानेश्वर सुप्रतिष्ठे (५) पासून अष्टी (१६) पर्यंतचे छंद योजतो. तो प्रकार ज्ञानेश्वरीतल्या काही ओव्या घेऊन स्पष्ट करतो.

(१) षडक्षरी ओवी :

अउं नमो आद्या । वेद प्रतिपाद्या ।
जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।। अध्याय १

(२) सप्ताक्षरी ओवी :

देवा तूं चि गणेशु । सकलार्थप्रकाशु ।
म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजों ।।२।। अध्याय १

(३) अष्टाक्षरी ओवी :

तो कवणी स्थिति असे । कैसेनि रूपीं विलसे ।
देवा सांघावें हें ऐसें । लक्ष्मीपती ।।२८२।।

(४) नवाक्षरी ओवी :

तेथ अर्जुनु म्हणे देवा । हा चि अभिप्राॐ आघवा ।
मी पूसैन आतां सांघावा । कृपानिधी ।।२८५।।

(५) दशाक्षरी ओवी :

मग धनुष्यबाण सांडिले । न धरत आश्रृपात आले ।
ऐसें आइके तेथ वर्तलें । संजयो म्हणे ।।२७४।। अध्याय १

(६) एकादशाक्षरी ओवी :

ऐसेया व्यापका मातें जाणावें । तैं चि विभूति भेदें काइ करावें ।
परि हे तुज योग्यता नहवे । म्हणौनि असो ।।२४४।। अध्याय १०

(७) द्वादशाक्षरी ओवी :

जैसा रोगिया ज्वराहूनि उठिला । कां पा भणगा दुकळु पाहालआ ।
तैसा जिभांचा लल्लुलाट देखिला । अवाळुचें चाटितां ।।४२८।।

(८) त्रयोदशाक्षरी, चतुर्दशाक्षरी किंवा षोडशाक्षरी तीन चरण जींत आहेत अशी ओवी ज्ञानेश्वरीत नाही. ओवीतील एखाद्या चरणात १३, १४, १५ किंवा १६ अक्षरे क्वचित सापडतात.

अ

(१३) तरि मिया सांडिली जीविताची चाड ।
(११) आणि तुवां ही न धरावी भीड! ।।
(८) मनीं आहे तें उघड ।
(५) बोल पां सुखें !

आ

(१३) तयाचें जीवित ऐलथडिये आलें ।
(१४) म्हणौनि बुडालेपण जेविं वाया गेलें ।
(९) तेविं नुरे चि पाप केलें ।
(७) शेवटिलिया भक्ति ।।४१९।। अध्याय ९

इ

(१५) तो आतां अवसरें मजसारिखा होईल ।
(१०) ऐसा ही भाव तुज जाइल ।
(१०) हां गा अमृता आंत राहील ।
(७) तया मरण कैचें ।।४९।। अध्याय ९

ई

(१६) अगा कुळाकुळाचिया चोखटपणा न लगा ।
(८) अभिजात्य झणें श्लाघा ।
(७) व्युत्पत्तीचा वाउगा ।
(५) सोस कां वाहा ।।४२५।। अध्याय ९

षडक्षरी ओवीपासून षोडशाक्षरी ओवींपर्यंत अकरा प्रकारची ओवी ज्ञानेश्वरीत सापडते. पैकी तीनही चरणांत १३, १४, १५ किंवा १६ अक्षरे असलेल्या ओव्या ज्ञानेश्वरीत नाहीत. ६, ७, ८, ९, १०, ११, १२ अक्षरे तीनही चरणात असलेल्या ओव्या ज्ञानेश्वरीत वारंवार येतात. पंचाक्षरी चरणही बऱ्याच स्थळी आढळतात; परंतु सबंद तीनही चरण पाच अक्षरांचे मला कोठे आढळले नाहीत. पंचाक्षरी चरणांच्या ओव्या :

अ

व्याधीतें दावी । सवें चि हारवी ।।
आपपृथ्वी कालवी । एकवाठ ।।२२०।। अध्याय ६

आ

नागाचें पिलें । कुंकुमें नाहालें ।
वळण घेऊनि आलें । सेजे जैसें ।।२२२ ।। अध्याय ६

इ

मुखींचा ज्वाळीं । तळीं धरी कवळी ।
मांसाची वडवाळी । आरोगूं लागे ।।२३०।। अध्याय ६

पहिल्या तीन चरणांत चतुराक्षरी एक चरण किंवा तीन चरण ज्ञानेश्वरीत नाहीत. पाचापासून सोळापर्यंत सारखी अक्षरे तीन चरणात ज्यांच्या येतात अशा ओव्या ज्ञानेश्वरीत काही आहेत. तथापि विषमाक्षरी चरणत्रय ज्ञानेश्वरीत फार येतात; परंतु या विषामक्षरत्वालाही नियम आहे. पंचाक्षरी एक चरण असला, तर दुसरा चरण षडक्षरी किंवा अष्टाक्षरी असतो. अष्टाक्षरी चरण असला, तर नवाक्षरी किंवा सप्ताक्षरी दुसरे दोन चरण असतात. म्हणजे एकपासून तीनपर्यंत प्रत्येक चरणांत न्यूनाधिक्य असते. यापेक्षा जास्त न्यूनाधिक्य असल्यास जास्त अक्षरे बहुशाः काढून टाकून इतर चरणाशी चरण जुळता करून घेता येतो. उदाहरण :

बुद्धी मेचवेना धोंडीं । हा ठावो वरि मौवाळें सांडी ।

आठवो देशधडी । जाला दीसे ।।२४७।।

या ओवीचा प्रथम चरण अष्टाक्षरी आहे. दुसऱ्या चरणात दहा अक्षरे आहेत, त्यापैकी दोन अक्षरे अधिक आहेत, तेव्हा ती म्हणताना कमी केली पाहिजेत. तिसऱ्या चरणात सात अक्षरे आहेत, त्यात एक स्वर म्हणताना अधिक केला पाहिजे. म्हणजे ही ओवी म्हणण्यास नीट जावी म्हणून अशी लिहिली पाहिजे :-

बुद्धी मेचवेना धोंडीं । हा ठावो मौवाळैं सांडी ।
आठवाऊ देशधडी । जाला दीसे ।।१।।

अक्षरांचे न्यूनाधिक्य करण्याचे कारण असे की, ज्ञानेश्वरीतील ओव्या छंद आहेत. दहाव्या कलमात पंचाक्षरचरणात्मक अभंगापासून द्वादशाक्षरचरणात्मक अभंगापर्यंत अभंगांचे सुप्रतिष्ठादि प्रकार सांगितले. तेच प्रकार ओव्यांचे आहेत. अर्थात् सुप्रतिष्ठा अभंगाप्रमाणेच पंचाक्षरात्मक ओवी म्हणता येते. इतकेच की, जेथे अभंगांत चरणाचे उपान्त्य अक्षर प्लुत म्हणतात, तेथे ओवीत अंत्य अक्षर प्लुत म्हणावयाचे असते. उदाहरणार्थ, खालील षडक्षरी ओवी घ्या.

नाभीवरी पोखे । उदर हें थोके ।
अंतरीं फआंके । हृदयकोश ।।२०९।। अध्याय ६

ही ओवी षडक्षरचरणात्मक म्हणजे गायत्री अभंगाप्रमाणे म्हणता येते. 'जगाच्या कल्याणा' या अभंगाचीच चाल वरील ओवीला लागते. इतकेच की, ही ओवी अभंगाप्रमाणे म्हणताना तिसऱ्या चरणातील 'फां' या अक्षरातील स्वर छिन्न करावे लागतात म्हणजे 'फ आं' असा छेद करावा लागतो.

'बुद्धी मेचवेना धोंडी' ही ओवी अष्टाक्षरी अनुष्टुब् अभंगाच्या चालीने म्हणता येते. मात्र, दुसऱ्या चरणांतील 'वरि' हे अक्षरद्वय गाळावे लागते व तिसऱ्या चरणातील 'वो' या अक्षरातले आ+ऊ असे दोन स्वर छिन्न करावे लागतात. हा स्वरच्छेदाचा प्रकार वैदिक ऋचांच्या छन्द प्रस्तारात करतात.

संस्कृतात जसा अनुष्टुब् छंद शास्त्रात्मक किंवा वर्णनात्मक प्रबंधांत हरहमेष योजतात, त्याप्रमाणे मराठीत ओवीछंद धर्म, ज्योतिष, गणित, इतिहास, भूगोल, वेदान्त, योग वगैरेंवर ग्रंथ लिहिताना योजतात. कारण उघड आहे. अनुष्टुबांत प्रतिचरणी आठ अक्षरे आली म्हणजे बहुतेक काम भागते. कविप्रिय इतर वृत्तांत चारी चरणात नियमित गण यावे लागतात, तसा नियम अनुष्टुबाला नाही. म्हणजे अनुष्टुब् हजारो तऱ्हांनी रचता येतो. तोच प्रकार मराठीत ओवीचा आहे. परंतु ओवीत एक गुणाधिक्य आहे. ते हे की, अनुष्टुबाच्या चरणाला आठ अक्षरांचा समुदाय लागतो. ओवीच्या चरणाला पाच अक्षरांपासून अठरा अक्षरांपर्यंत वाटेल

तितक्या अक्षरांचा समवाय उपयोगी पडतो. याचा अर्थ, संस्कृतात अष्टाक्षरमय असा एक अनुष्टुब्‌च छंद छंदोमय गद्य लिहिण्याला घेतात. शिवाय, संस्कृत अनुष्टुब् चारी चरणांत समाक्षर असतो. मराठी ओवीत पहिल्या तीन चरणात एक दोन अक्षरे कमी जास्त असली तरी चालतात. म्हणजे मराठी ओवी विषमाक्षरीही होऊ शकते. ओवीचा चौथा चरण अर्धापाऊण जात्याच असतो आणि त्याखेरीज तीन चरणही विषमाक्षर होऊ शकतात. त्यामुळे वर्णमाला हा छंद फार उपयोगाचा व सुसाध्य आहे. शतवाहनाच्या बाराव्या शतकापासून अठराव्या व एकोणिसाव्या शतकापर्यंत वर्णनात्मक व टीकात्मक अनेक ग्रंथ ओवी छंदांत झालेले आहेत; त्याचे मुख्य कारण या छंदांचे सौलभ्य होय. पहिल्या तीन चरणांना यमकाचा काय तो निर्बंध आहे.

ही सौलभ्याची बाब लक्षात घेऊन ज्ञानेश्वरांनी आपली ज्ञानेश्वरी रचली. अठराव्या अध्यायाच्या शेवटी ओवीछंदासंबंधाने ज्ञानेश्वर येणेप्रमाणे लिहितो :-

(९) तैसी गाणीवेते मिरवी ।
(९) गीतेवीण ही रंगु दावी ।
(८) तो लोभाचा बंधु वोवी ।
(४) केली मियां ।।१।।
(८) तेणें आबालसुबोधें ।
(८) वोवियेचेनि प्रबंधें ।
(७) ब्रह्मरससुस्वादें ।
(६) अक्षरें गुंथिलीं ।।२।।

म्हणजे, हा ओवी नावाचा जो बंध आहे तो गाताही येतो व नुसता गद्याप्रमाणे सयमक गद्याप्रमाणे, वाचताही येतो. तसेच, हा बंध अज्ञानापासून तो सज्ञानापर्यंत सर्वांना सारखाच सुबोध आहे. समगण किंवा समाक्षरे यात असावी लागतातच असा निर्बंध नाही, बरे, असली तरीही काही बिघडत नाही; उत्तमच. सारांश, अडाणी लोकांनाही हा छंद सुलभ आहे. ओव्या लहान चार चार वर्षांच्या पोरीही म्हणतात. असा हा आबालसुबोध छंद ज्ञानेश्वराने वापरला आहे.

पोरी षडक्षरी ओवीपासून दशाक्षरी ओवीपर्यंत ओव्या म्हणतात. उदाहरण :

(७) शिंद्याच्या लष्करांत । इत्यादी — हेमाक्षीवृत्त
(६) आमूच्या बोकीला । होती तीन पिलें । इत्यादी — मातंगी वृत्त
(८) पेशव्यांच्या पूणेयांत । बाजीराया बांधी वाडा । इत्यादी — विद्युन्माला
(९) बाजीरायाच्या तैनातींत । हंबीरराव बारगीर ।
(१०) बाजीरावाच्या खिजामतींत । हंबीररावजी शिलेदार

या ओव्यांचा प्रत्येक चरण कोणत्या ना कोणत्या तरी वृत्ताचा आहेच. हाच प्रकार ज्ञानेश्वराच्या व इतरांच्या ओव्यांना लागू आहे. कित्येक चरणांच्या वृत्तांना संस्कृतात नावे आहेत. कित्येकांच्या वृत्तांना नावे नाहीत. संस्कृतात तरी छंदाचे जे कोट्यवधी प्रकार आहेत त्या सर्वांना नावे नाहीत. अमुक छंदातले अमुक नंबरचे वृत्त, असा संख्यानिर्देश करण्याचा छंद शास्त्रज्ञांचा परिपाठ आहे. तोच कित्ता ज्ञानेश्वरादी ओवीप्रबंधकारांनी उचलला आहे.

पहिल्या तीन चरणात जास्तीत जास्त १८ अक्षरे असावी, चौथा चरण इतर तीन चरणाहून अक्षरांनी लहान असावा व चौथ्या चरणात जास्तीत जास्त बारा अक्षरे असावी, असा ओवीचा निर्बंध आहे व तो बहुतेक कवी व ग्रंथकार पाळतात. एकटा वामन तेवढा या सिद्धांताला अपवाद दिसतो. परंतु, तोही पहिल्या तीन चरणांत १८ हून जास्त अक्षरे योजीत नाही. चौथ्या चरणात १२ हून जास्त अक्षरे घालणे व तो इतर सर्व चरणाहून मोठा करणे; ही दोन पापे मात्र तो अतिशय करतो. मासल्याकरिता यथार्थदीपिकेतून दोनचार ओव्या देतो :

(११) तैसें तेंचि सत्त्व तो चि आत्मा ही ।
(१५) अविद्येंत विद्येंत ही तया अन्यत्व नाहीं ।
(१३) परी स्वप्नदृष्टीं स्वप्न दिसे तें कांहीं ।
(१७) नाहीं च तैसें अनुभवीं न दिसती रजतम ।।५५०।। अध्याय १४

या ओवींत चौथा चरण इतर चरणांहून मोठा आहे व त्यात बारांहून जास्त अक्षरे आहेत.

(११) यालागीं जो सत्त्ववृद्धींत मेला ।
(१८) आणि उत्तमविदांचिया अमल लोकांतें पावला ।
(८) तो जाणावा उपजला ।
(८) ज्ञाननिष्ठां मनुष्यांत ।।६०१।। अध्याय १४

या ओवींत अठरा अक्षरांचा एक चरण आहे. वामनाला चिमुकलीही ओवी रचता येते.

(६) रजाचें तों फळ ।
(८) दु:ख म्हणजे घननीळ ।
(७) त्याचा अर्थ निवळ ।
(३) ये रीती ।।६३१।। अध्याय १४

वामन कधी कधी किंवा वारंवार एखाद्या चरणात सबंध किंवा अर्धा श्लोकच्या श्लोक घुसडतो. अशा स्थळी चरणात अक्षरे आठराहून जास्त होतात. याला प्राकृत पिंगलाने एक तोड काढली आहे. जेव्हा एखाद्या चरणात दहापाच किंवा पाचपंचवीस अक्षरे जास्त उच्चारावयाची असतात, तेव्हा ती सर्व अक्षरे एका मात्रेदाखल समजावी, असा त्याने संकेतच

केलेला आहे. उदाहरणार्थ-

(७) तत्त्व ऐसें म्हणोनी ।
(२२) ''तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनायं'' या श्लोकेंकरूनी ।
(१२) बोलिलें मागें कीं रजतमांहुनी ।
(१३) निर्मळपणें प्रकाशक सत्त्वगुण ।।५३१ ।। अध्याय १४

येथे दुसऱ्या चरणातील १६ संस्कृत अक्षरे एका मात्रेदाखल समजावयाची आहेत. म्हणजे,

तत्त्व ऐसें म्हणोनी । यया श्लोकें करूनी ।। इ. इ.

अशी ही ओवी समजावयाची आहे. असो. याचा अर्थ इतकाच की, वामनाने खरोखरच समयक गद्याच्या रूपाला ओवी आणून पोचविली आहे.

एकनाथी ओवीच्या चौथ्या चरणाच्या मध्ये यमक असते व कधी कधी चौथा चरण, अक्षरांनी इतर चरणांच्या ओवीला किंवा त्यांच्याहून अधिक अक्षरांचा असतो.

ज्यात काव्य नाही असे गणित, ज्योतिष, वेदान्त, चरित्र, टीका, राजकारण वगैरे विषय ज्याप्रमाणे ओवीछंदात रचता येतात, त्याप्रमाणे उत्कृष्ट काव्यही ओवीबंधांत रचलेले मराठीत विपुल आहे. मुक्तेश्वर, श्रीधर, वगैरेंनी उत्कृष्ट काव्य ओवीछंदाच्या रूपानेच निर्माण केलेले आहे. ज्ञानेश्वरीत दृष्टांत देताना जी छंदोरचना झाली आहे, ती अत्युत्कृष्ट काव्य आहे, परंतु तद्व्यतिरिक्त ओव्या केवळ सयमक गद्य होत. गुरुचरित्र सयमक गद्य आहे, काव्य नाही. दासोपंतांचा गीतार्णव सयमक गद्य टीकाग्रंथ आहे. वामनाची यथार्थदीपिकाही सयमक गद्यटीका आहे. अनेक ओवीमय वेदान्तग्रंथ केवळ सयमक गद्य आहेत.

२६. येणेप्रमाणे चूर्णिका, कटिबंध, कडाका, छप्पा, सवाई, घनाक्षरी, साकी, दिंडी, अभंग व ओवी या दहा प्रकारच्या छंदांची सोदाहरण छाननी येथपर्यंत केली. आता या सर्वांची पूर्वपरंपरा सांगतो.

(अ) कटिबंध, कटाव वगैरे प्रकार छंदापेक्षा संगीतात मोडतात, असे आठव्या कलमांत सांगितलेच आहे. तेव्हा, त्यांची परंपरा संगीत शास्त्राच्या इतिहासात पाहिली पाहिजे, हे उघड आहे.

(आ) चूर्णिका व कडका अथवा कडाका गद्यकाव्यात मोडतात. बाण वगैरे गद्यकवींनी हा प्रकार योजिलेला आहे. तोच मराठी कवींनी मराठीत आणला आहे. भवभूत्यादी कवींनी आपल्या नाटकातील प्राकृत भाषेत हा व इतर प्रकार आणले आहेत. हे प्रकार संस्कृतांतून व प्राकृतांतून मराठी कवींना वंशपरंपरेने मिळाले आहेत. हे त्याच्या व्युत्पत्तीवरूनच (कडाका = कडाक्षक) दिसते. येथे मराठी कवींनी आपले नवीन असे काहीच घातलेले दिसत नाही.

(इ) मराठी सवाई गणवृत्तात्मकच आहे. तेव्हा, ती संस्कृत गणवृत्तांवरून घेतली आहे,

हे सांगावयाला नकोच.

(ई) छप्पा मराठीत फारसा नाही व जो क्वचित् आहे तो प्राकृतातून घेतला आहे. शिवाय, छप्पा हा छंदापेक्षा संगीतात मराठीमध्ये फार आढळतो.

(उ) साकीची परंपरा पाचव्या कलमात सांगितली आहे.

(ऊ) दिंडी संस्कृतपिंगलात, प्राकृतपिंगलात किंवा छंद शास्त्रावरील कोणत्याही संस्कृत ग्रंथात सांगितलेली नाही, परंतु व्युत्पत्तीवरून हे वृत्त महाराष्ट्री भाषेत असावे, असा तर्क होतो. महाराष्ट्री भाषेच्या छंदःशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ नाही, यामुळे निश्चयाने महाराष्ट्री दिंडीविषयी काहीच लिहिता येत नाही. प्राकृत पिंगल इ.स. चौदाव्या शतकाच्या सुमारास लिहिलेले असून, त्यातील छंद दहाव्या शतकापासून चौदाव्या शतकापर्यंतच्या हिंदुस्थानातील जुन्या हिंदी ऊर्फ प्राकृत भाषेला अनुलक्षून लिहिलेले आहेत. तेव्हा पाचव्या शतकातल्या महाराष्ट्री भाषेतील छंदांचे स्वरूप प्राकृतपिंगलावरून अनुमानणे किंवा निश्चयाने ताडणे धोक्याचे आहे. तत्रापि, दिंडी पाचव्या शतकाइतकी जुनी आहे, यात संशय नाही. महाराष्ट्री छंदाचा ग्रंथ सापडेतोपर्यंत दिंडी हे मात्रावृत्त मराठीत नवीन आहे, असे मानणे जरूर आहे.

(ऋ) घनाक्षरी दंडक आहे, म्हणून सातव्या कलमांत तपशिलाने सांगितले आहे.

(लृ) ओवी आणि अभंग मिळून मराठीत एक छंद समुद्रच आहे. या दोहोंचा तपशील वर दिला आहे. येथे त्यांची परंपरा सांगतो. ओवी आणि अभंग ही अक्षरवृत्ते आहेत. प्रतिचरणी गणांचा जेथे एक नियम नसतो ती अक्षरवृत्ते. अभंग व ओवी यांना चार चरण असतात, जास्त नसतात व कमीही नसतात. चार चरणी छंद प्राकृत, संस्कृत व वैदिक भाषेत आहेत. तेव्हा, यांच्या चरणचतुष्टयत्वाची परंपरा वैदिक छंदापर्यंत जाते हे स्पष्ट आहे. संस्कृत व प्राकृत छंद मात्रा वृत्तात्मक किंवा गणवृत्तात्मक असतात; अक्षरवृत्तात्मकत्व वैदिक छंदांपासून घेतलेले आहे, असे म्हणण्यास आधार मिळतो. ओवी व अभंग यांचे चारी चरण विषमाक्षरक असतात. कित्येक वैदिक छंदांचे चतुष्पाद असल्यास चारी चरण, किंवा त्रिपाद असल्यास तिन्ही चरण विषमाक्षरक असतात. तेव्हा ओवी व अभंग यांचे विषमाक्षरत्वही वैदिकच आहे. तात्पर्य, ओवी व अभंग ही वैदिक छंदांची रूपांतरे आहेत. वैदिक छंदांत व या मराठी छंदांत पहिला मोठा भेद म्हटला म्हणजे स्वरांचा होय. त्यामुळे, म्हणण्याच्या चालीत फरक झाला आहे. दुसरा भेद यमकांचा होय व तिसरा भेद अठरा अक्षरांहून जास्त अक्षरे चरणात न घेण्याचा होय.

दोन, तीन, पाच किंवा सहा चरण वैदिक छंदात असू शकतात. परंतु अभंग, ओवी यांना चार चरणांहून कमी किंवा जास्त चरण खपत नाहीत. या कामी संस्कृत छंदांचा नियम अभंग व ओवी यांनी स्वीकारिला आहे. परंतु चौथ्या चरणाचे ऊनाक्षरत्व यांनी आर्ष छंदावरून घेतले आहे. संस्कृतात चौथा चरण ऊनारक्षक नाही. ऊनाक्षरक चरणाला आर्ष छंदोविद् निचृत् छंद म्हणतात. चौथ्या चरणाच्या या ऊनाक्षरत्वाची आर्ष छंदांत किंमत नाही. का की, आर्ष छंदात पहिला, दुसरा, तिसरा, चौथा किंवा कोणताही चरण निचृत् असू शकतो. मराठीत

चौथाच चरण तेवढा ऊनाक्षरक असावा, असा नियम आहे. त्याने होते काय की, अभंग किंवा ओवी संपली कोठे हे निश्चयाने कळते.

विषमाक्षरी व विषमगणी अभंगात किंवा ओवीत आणि समाक्षरी व समगणी संस्कृत कर्णमधुर छंदांत किंवा वृत्तांत भेद असा आहे की, ही गुलगुलित संस्कृत वृत्ते प्रतिचरणी म्हणताना एकसारखी असल्यामुळे दहा वीस एकापाठीमागे एक आली तर कंटाळवाणी होतात. हा कंटाळवाणेपणा घालविण्यासाठी संस्कृत कवी वर्णन करताना प्रायः निरनिराळी वृत्ते योजतात. कालिदासाचे मेघदूत किंवा अजविलाप यांतील शंभर शंभर श्लोक एका वृत्ताने म्हणताना हा कंटाळवाणेपणा लक्षात येतो. असला कंटाळवाणेपणा ओवीत किंवा अभंगात कवी चाणाक्ष असला तर येत नाहीच; पण गावंढळ व साधा असल्यासही क्वचित येतो. का की, एकेका छंदाचे जे हजारो प्रकार आहेत, त्यातील हवा तो प्रकार अभंगकार किंवा ओवीकार सहज घेऊ शकतो आणि पाच अक्षरांपासून अठरा अक्षरांपर्यंतचे चरण लक्षावधी तऱ्हेने रचता येणे शक्य असल्यामुळे, त्यांच्या चालीही दरचरणी बदलतात. कंटाळवाणे न होण्याचा हा गुण आर्षछंदांतही आहे. त्याचे कारण आर्षछंदांच्या अक्षरवृत्ततत्वांत व विषमाक्षरत्वांत आहे.

वैदिक ऊर्फ आर्ष अक्षरवृत्तांचे गण पाहून संस्कृत गणवृत्तांप्रमाणे त्यांची छंदोविचिती करून दाखविता येईल. अर्थात्, कोणत्याही आर्षछंदाच्या प्रत्येक चरणाचे गण इतर चरणांहून भिन्न भासतील. तोच प्रकार ओवी व अभंग यांचा आहे. केवळ अक्षरे मोजून यांची छंदोविचिती करता येईल किंवा प्रतिचरणाचे गण पाहून छंदोविचिती करता येईल. दोन्ही पद्धती व दाखविल्या आहेत. गणांनी छंदोविचिती करण्यापूर्वी अक्षरांनी छंदोविचिती आर्षकाळी करीत असत हे उघडच आहे. विषमाक्षरी आर्षछंदाची काही उदाहरणे देतो.

(अ) अग्ने तव श्रवो वयो (८)
महिभ्राजन्ते अर्चयो विभावसो । (१२)
बृहयानो शक्सा वाचमुक्थ्यं (११)
दधासि दाशुषे कवे ।। (८)

(आ) विद्वांसाविदुरः पृच्छे- (८)
दविद्वानत्थापरो अचेताः । (१०)
नूचिन्नु मर्त्ये, अक्रौ ।। (७)

आर्ष अक्षरवृत्तांप्रमाणे ओवी हे अक्षरवृत्त आहे, हे मागे सांगितलेच आहे. आर्ष अक्षरवृत्तांत निवड होऊन त्यांची पुढे दोन रूपांतरे झाली. गणवृत्ते व मात्रावृत्ते. शातवाहनाच्या पाचव्या शतकात मराठी भाषा जेव्हा सुरू झाली, तेव्हा आर्ष अक्षरवृत्ते आणि संस्कृत गणवृत्ते व मात्रावृत्ते मराठी भाषा बोलणाऱ्या कवीच्या पुढे होती. त्यापैकी गणवृत्ते व मात्रावृत्ते यांच्याकडे ओढा न दाखविता त्यांनी अक्षरवृत्तेच पसंत केली असे दिसते, अथवा, छंदोरचनेत दोन तीन हजार वर्षंच्या अवधीत जी प्रगती

झाली होती, तिच्याकडे दुर्लक्ष करून, पुनः दोन तीन हजार वर्षांपूर्वीच्या अक्षरवृत्तांकडेच मराठी कवींनी धाव घेतली. म्हणजे, नवीन विटी व नवा दांडू घेऊन राष्ट्र पुनः नवा डाव खेळू लागले. या नव्या डावाचे ओवीछंद हे एक रूप आहे. वैदिक छंदाप्रमाणे ते विषमस्वरूप व ओबडधोबड आहे. ते समस्वरूप व नीटनेटके कालांतराने होईल, हे सांगण्यास मोठेसे भविष्यज्ञान हवे आहे असे नाही.

२७. वाङ्मयाचे प्रकार दोन : काव्य व अकाव्य. काव्य पद्यरूप किंवा गद्यरूप असते, तसेच अकाव्यही पद्यरूप किंवा गद्यरूप असते. वेदान्त, गणित, ज्योतिष, चरित्र, राजकारण, नीती, धर्म वगैरेंवर ओवीपद्यांत लिहिलेले मराठी ग्रंथ पद्यरूप अकाव्य होत आणि मुक्तेश्वरी भारत वगैरे ग्रंथ पद्यरूप काव्य होत. गणित, शास्त्र, कायदा, धर्म यावर लिहिलेले गद्य ग्रंथ गद्यरूप अकाव्य आहेत आणि बालमित्रांतील काही भाग गद्यरूप काव्य आहे. हाच भेद मराठीतील ओवीछंदोमय ग्रंथांना लावावयाचा आहे. काही ओवीपद्यरूप ग्रंथ काव्य आहेत व काही अकाव्य आहेत; संस्कृत अनुष्टुप्पद्यरूप ग्रंथांतही काव्याकाव्य भेद आहेच. वाल्मीकीचे रामायण काव्य आहे; मनुस्मृति अकाव्य आहे. इतर पद्यांनाही हाच नियम लागतो. भामिनीविलास काव्य आहे. भास्कराचार्यांच्या लीलावतींतील श्लोक अकाव्य आहेत. अकाव्याच्या कर्त्यांनी यद्यपि पद्यांत ग्रंथरचना केली तत्रापि तेवढ्याने त्यांना कोणी कवी म्हणत नाही. हाच नियम मराठी ग्रंथकारांना लाविला पाहिजे. गीतेवर टीका करणारे ज्ञानदेव, दासोपंत, वामन, रंगनाथ, बाबा गर्दे हे कवी नव्हत. पंचीकरण, हठयोग, वेदांत, कर्मयोग, समाधी, राजकारण वगैरेंवर ओवी छंदांत ग्रंथरचना करणारे दासोपंत, वामन, मुक्तेश्वर, आनंद, मृत्युंजय, जयराम, रामदास वगैरे काव्य करणारे कवी नव्हेत. यादृष्टीने पहाता मराठीत जसे काव्यकर्ते कवी होऊन गेले, त्याप्रमाणेच अकाव्य अथवा काव्येतर ग्रंथरचना करणारे ग्रंथकार होऊन गेले आहेत. यद्यपि त्यांनीं पद्यांत लिहिले, तत्रापि त्यांचे अकाव्यकर्तृत्व लोपून जात नाही.

२८. चारी चरण विषमाक्षरी व विषमगणी ज्यात आहेत असा छंद दुसऱ्या कोणत्या भाषेत आहे की काय, हे पाहू गेले असता असे आढळते की, इंग्लिश भाषेत अशी कविता आढळते. एका चरणाचे जे गण असतील तेच गण दुसऱ्या चरणाचे जीत नाहींत, अशी कविता शेक्सपीयरच्या नाटकात सापडते. ओवीछंदात व शेक्सपीरियन कवितेत भेद हा की, शेक्सपीयरच्या नाटकातील कवितेत चार चरणांचा निर्बंध नाही व यमक नाही. बाकी दोहोंत साम्य आहे. ओवीत कमी जास्त गण चालतात, तसे शेक्सीपरियन नाटकी कवितेतही चालतात. ओवीत विषमगण चालतात, शेक्सपीरियन नाटकी कवितेतही चालतात. ओवीचे पहिले तीन चरण अठरा अक्षरांचे व चवथा चरण तीन अक्षरांचा असला ती खपेल, तसा प्रकार शेक्सपीरियन नाटकी चालतात. ओवीत विषमगण चालतात, शेक्सपीरियन नाटकी कवितेतून चालतात. ओवीचे पहिले तीन चरण अठरा अक्षरांचे व चवथा चरण तीन अक्षरांचा असला तरी खपेल, तसा प्रकार शेक्सपीरियन नाटकी कवितेत मात्र खपावयाचा नाही. या बाबतीत मराठी ओवी शेक्सपीरियन नाटकी कवितेहून श्रेष्ठ आहे. शेक्सपीरियन नाटकी कविता संस्कृत समाक्षरी व समगणी श्लोकासारखी म्हणता येत नसल्यामुळे ती म्हणताना गद्यासारखी भासते. ओवी विषमाक्षरी व विषमगणी असूनही शेक्सपीरियन नाटकी कवितेपेक्षा जास्त पद्यमय म्हणता येते व संस्कृत श्लोकापेक्षा जास्त गद्यरूप भासते. कारण उघड आहे. संस्कृत श्लोकाला समाक्षरत्वाची व

समगणत्वाची जी जरूर आहे व जिच्यामुळे तो म्हणताना प्रतिचरणी उच्चारस्थानात तेच तेच वळसे घ्यावे लागतात ती जरूर ओवीला नाही. तसेच, शेक्सपीरियन नाटकी कवितेला चरणांचा जो निर्बंध नाही, तो ओवीला आहे. त्यामुळे, ओवी म्हणताना जास्त पद्यमय भासते. सारांश, ओवीछंद अथवा ज्ञानेश्वर म्हणतो त्याप्रमाणे बंध, वर्णनात्मक विषयाला फार सुलभ व सोयीस्कर आहे. या बंधाचे चरण यद्यपि वैदिक व संस्कृत वृत्तचरण आहेत, तत्रापि याचा प्रचार मराठीतच फार आहे. इतर गौडी भाषांत ओवीबंध नाही.

२९. ओवीबंधाचा इतिहास असा. ऊनाक्षरक चौथा चरण ओवीने वैदिक निचृत वृत्तांपासून घेतला आहे. आर्षभाषा संस्कृत झाल्यावर समगणी व समाक्षरी वृत्तांचा प्रचार संस्कृत म्हणजे विद्यासंपन्न लोकांत फार झाला. परंतु प्राकृत जे लोक होते ते विषमगणी व विषमाक्षरी वृत्ते योजितच असत. हा प्रकार शातवाहनाच्या कारकीर्दीच्या अंतापर्यंत म्हणजे शक २०० पर्यंत चालला. पुढे तीनशे वर्षे महाराष्ट्रात भयंकर अराजक माजले. संस्कृत लोक नाहीसे झाले किंवा त्यांचे वर्चस्व कमी झाले; त्याबरोबर प्राकृत विषमाक्षरी व विषमगणी गावंढळ कवितेला जोर मिळाला. असे दिसते की, शतवाहनाच्या पाचव्या शतकात चालुक्यांच्या राशियतीच्या प्रारंभापासून ओवीबंध महाराष्ट्रांत जारीने चालू झाला. 'आप्पा धोप्पा' किंवा 'एक्कल काजा दुङ्घी बिराजा' वगैरे कविता त्या कालची होय. संस्कृतांत पाच अक्षरांपासून आठरा अक्षरांपर्यंत जेवढे छंद आहेत तेवढे सर्व ओवीबंधात प्राकृत लोक योजू लागले. योजताना एक मात्र फरक होऊ लागला. वृत्तांच्या चरणात कमी जास्त अक्षरे घुसडली जाऊ लागली व ऱ्हस्वदीर्घ अक्षरांच्या ठिकाणी दीर्घऱ्हस्व अक्षरांचा उपयोग होऊ लागला. हा उपयोग प्राकृत लोक कसा करतात याचे उदाहरण रामदासी व इतर आधुनिक श्लोकबद्ध कवितेत आढळते. रामदासाचे व रामदासीयांचे जे श्लोक आहेत, त्यांत समाक्षरी व समगणी वृत्ते रचण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि मध्येच जशी आली तशी ऱ्हस्वदीर्घ अक्षरे किंवा प्रसंगी कमी जास्त अक्षरे योजिलेली आहेत. हा चमत्कार हिशेबाचे, गणिताचे व जे जे श्लोक मराठीत आहेत त्यातही दृष्टीस पडतो. तोच प्रकार शालिवाहनाच्या पाचव्या शतकात झाला. होता होता विषमाक्षरी व विषमगणी ओवी अस्तित्वात आली. समाक्षरी व समगणी ओवीची उदाहरणे मागे मी दिली आहेत, त्यावरून हे स्पष्टच आहे की, समाक्षरी व समगणीही ओवी असू शकते. परंतु मिळालेले छंद स्वातंत्र्य सोडून छंद पारतंत्र्य कोण स्वीकारतो? संस्कृत छंदांच्या चरणांना अक्षरे सारखी व गण सारखे पाहिजेत. त्याशिवाय त्यांना प्रायः वृत्तत्वच येत नाही. असा निर्बंध आयता एकदा जो मोडला, तो पुन्हा जारी कोण करतो? असा ओवीबंधाचा इतिहास आहे. या बंधांत पांच अक्षरांपासून अठरा अक्षरापर्यंतच्या सर्व छंदांच्या वृत्तांचे चरण येतात. सारांश, हा ओवीबंध एक स्वतंत्र छंद समुद्र आहे व तो स्वातंत्र्याभिलाषी मराठ्यांच्या मनाचा पूर्ण द्योतक आहे.

३०. हा आबालसुबोध ओवीबंध शातवाहनाच्या पाचव्या शतकात सर्व महाराष्ट्रात जो

प्रचलित झाला, तो बाराव्या शतकात मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव इत्यादींच्या हातातून एकनाथ, रामदास वगैरेंच्या हातात गेला आणि तेथून आतापर्यंत महाराष्ट्रात नांदतच आहे. परंतु या काळात संस्कृत समगणी व समाक्षरी वृत्तांचा मराठ्यांना अगदीच विसर पडला होता असे नाही. अशी वृत्ते बाराव्या शतकापासून आतापर्यंत पुष्कळ महाराष्ट्र कवी योजीत आले आहेत.

३१. म्हणजे मराठीत सध्या संस्कृत छंदोबंध व मराठी छंदोबंद असे दोन बंध सुरू आहेत. मराठी छंदोबंध म्हणजे प्रामुख्याचे ओवीबंध होय. हा बंध संस्कृतातून बहुतेक लुप्तप्रायच आहे. वैतालीय, उपजाति, अनुष्टुब् वगैरे छंदांत विषमगणत्वाची व विषमाक्षरत्वाची किंचित् झाक मारते. परंतु ती झांक ओवीबंधाच्या धडाक्यामुळे केवळ क्षुद्र आहे !

३२. ओवीबंध दोन प्रकारचा : ओवी व अभंग. प्रत्येक समाक्षरी व किंचित् विषमाक्षरी ओवी अभंग होऊ शकते व अभंगासारखी म्हणता येते. पण प्रत्येक अभंग ओवी होऊ शकत नाही. कारण, ओवीचे तिन्ही चरण यमक असावे लागतात. अभंगाला हा निर्बंध नाही. कित्येक अभंगांचे दुसरा व तिसरा असे दोनच चरण सयमक असतात. त्यामुळे सयमक चरणत्रयात्मक जो अभंग तेवढाच काय तो ओवी होऊ शकतो. तसेच, अभंग आणि ओवी यामध्ये दुसरा भेद असा की अभंगाच्या तिनही चरणांत प्रायः समाक्षरे असावी लागतात व विषमाक्षरत्व असले तर ते एकदोन अक्षरांचेच तेवढे मिनतवारीने खपले जाते. ओवीत तिन्ही चरणांत विषमाक्षरत्व सहासात अक्षरांचेही चालते. सारांश, अभंगापेक्षा ओवी जास्त स्वतंत्र आहे.

३३. संस्कृतांत इतिहास म्हणून ज्या काव्यांना म्हणतात, म्हणजे रामायण, भारत वगैरे जी ऐतिह्य काव्ये आहेत, ती सर्व, गणांचा एक नेम ज्यात नाही, त्या अनुष्टुब् छंदांत रचलेली आहेत. इंग्लिश भाषेत शेक्सपीयरने ऐतिहासिक नाटके रचण्यात जो अनियमित छंद योजलेला आहे तो, ऐतियाला योग्य आहे. मिल्टनाने प्यारेडाइज लॉस्ट हे काव्य रचण्यात जो छंद घेतला आहे, तो ऐतिह्य काव्याला असावा तसा योग्य नाही. खरा ऐतिह्य छंद शेक्सपीरियन ऐतिहासिक नाटकांचाच होय व थोडेबहुत खरे इंग्लिश ऐतिह्य, शेक्सपीरियन ऐतिहासिक नाटकेच होत. फ्रेंच भाषेत व्हाल्टेयराने हेन्रियड काव्य रचताना जो छंद योजिला आहे, तो जसा असावा तसा ऐतिह्य नाही. म्हणजे फ्रेंच भाषेत इंग्लिशभाषेप्रमाणेच असावे तसे ऐतिह्य नाही. जर्मन भाषेतही ऐतिहह्य नाही. ग्रीक भाषेत होमराने ऐतिह्य छंदांत इलियड लिहिले आहे. त्याप्रमाणेच मराठीतही ओवीछंद किंवा बंध ऐतिह्य विषयाला योग्य आहे. मुक्तेश्वराचे भारत मराठी ऐतिया आहे. इतर अनेक कवींनींही ओवीछंदांत भारते रचिली आहेत; परंतु मुक्तेश्वराची धीरगंभीर रचना त्यांना साधलेली नाही. दोष ओवीबंधाचा नसून, कर्त्यांच्या प्रतिभाभावाचा आहे. ऐतिह्य प्रतिभा, ऐतिह्य विषय व ऐतिह्य छंद या त्रयींची जेव्हा सांगड घडावी तेव्हा ऐतिह्य काव्य निर्माण होते. मोरोपंताची आर्या ऐतिह्य विषयाला ओवीच्या इतकी योग्य नाही. त्यामुळे मुक्तेश्वराच्या भारताने जो ऐतिह्य ठसा वाचकांच्या मनावर उठविला जातो, तो मोरोपंतांच्या भारताने उठत नाही.

मोरोपंतांपेक्षा मुक्तेश्वर कविप्रतिभेच्या दृष्टीने जो मोठा भासतो, त्याचे एक मुख्य कारण मुक्तेश्वराने योजिलेला ऐतिह्य ओवीबंध होय. महान् युद्धाची घनगर्जना व लहानशा चकमकींतील शस्त्रांचा खडखडाट यांतले जे अंतर तेच मुक्तेश्वराच्या ओवीत व मोरोपंताच्या आर्येत भासमान होते.

♦ ♦ ♦

वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
।। श्री विश्वनाथो विजयते ।।